# आदिवासी कलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी वारली पेंटिंग कार्यशाळा

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे ही महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागाची स्वायत्त संस्था असून राज्यातील ४५आदिवासी जमातीच्या सर्वांगीण उन्नती साठी कार्यरत आहे. राज्यातील विविध आदिवासी जमातीच्या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी TRTI ही संस्था विविध उपक्रम राबवित असते.आदिवासी मधील वारली जमातीची चित्रकला अप्रतिम आणि अद्वितीय आहे. ही वारली पेंटिंग सध्या देशाच्या सीमा पार करुन विदेशातील अनेक राष्ट्रांपर्यंत पोहचली आहे ही आपल्या साठी अभिमानाची बाब आहे. या कलेला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने  दिनांक १२ मे २०२६ ते २१ मे २०२६ या कालावधीत वारली चित्रकला कार्यशाळचे यश रेजेंसी ४१२-सी, के.एम. मुन्शी रोड, लक्ष्मी सोसायटी, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे या ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेसाठी पालघर जिल्हयाच्या डहाणू, तलासरी, पालघर या तालुक्यातील आणि अहिल्यानगर जिल्हयाच्या अकोले तालुक्यातील अनुसूचित जमातीचे वारली चित्रकार सहभागी झाले आहेत. ही कार्यशाळा केवळ चित्रकार,कलावंत यांनाच प्रोत्साहन देणारी नसून उद्योजक, व्यावसायिक, कला क्षेत्रातील गुंतवणूकदार यांना देखील प्रोत्साहन देणारी आहे. आपल्या व्यवसाय उद्योगाच्या ब्रॅण्डिंगसाठी आणि वाढीसाठी वारली चित्रकलेचा वापर करता येऊ शकतो यासाठी उद्योजक, व्यावसायिक यांच्यासह कलाप्रेमींनी या कार्यशाळेस भेट देण्याचे आवाहन आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांनी केले आहे.